सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

## महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना

## राज्य आरोग्य हमी सोसायटी

जीवनदायी भवन, राज्य कामगार विमा योजना रुग्णालय आवार गणपत जाधव मार्ग,वरळी, मुंबई ४०० ०१८
दुरध्वनी क्रमांक- ०२२- २४९९९२०३/०४/०५, website www.jeevandayee.gov.in

राआहसो/माशिसं/काअ/१०३८७ / १२७३/२०२२ दिनांक: १०/०८/२०२२

**विषय** - एकत्रित आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेचे ४ बॅनर्स आणि १ लक्ष पॅम्प्लेट छपाई करण्यासाठी दरपत्रके पाठविण्याबाबत.

उपरोक्त संदर्भ व विषयास अनुसरुन कळविण्यात येते,एकत्रित आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेचेच्या प्रचार व प्रसिद्धी करीता दोन्ही बाजूस फोर कलर प्रिंटिंगसह १ लक्ष पॅम्पलेट छपाई व ४ बॅनर्स (१०x६) बनवायचे असल्यामुळे आपली दरपत्रके राज्य आरोग्य हमी सोसायटी,वरळी या कार्यालयीन सादर करण्यात यावी. पॅम्पलेट नमुना सोबत जोडण्यात येत आहे.

कामकाजाच्या ३ दिवसाच्या आत

आपले दरपत्रक प्राप्त झाल्यानंतर ते स्विकृत झाल्यास, त्याबाबत आपणस यथावकाश कळविण्यात येईल.

(दिलीप कवठकर)
महाव्यवस्थापक, प्रशासन
राज्य आरोग्य हमी सोसायटी

महाराष्ट्र शासन

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# एकत्रित महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत -प्रधानमंत्री जन आरोग्य योजना




**अल्प उत्पन्न असलेल्या कुटुंबांसाठी नि:शुल्क व गुणवत्तापूर्ण आरोग्य उपचार**

## महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेचा लाभ घेण्यासाठी

### लाभार्थी

- पिवळे, केशरी, अंत्योदय अन्न योजना, अन्नपूर्णा योजना शिधापत्रिकाधारक कुटुंबे
- अवर्षणग्रस्त १४ जिल्हयातील शुभ्र शिधापत्रिका व ७/१२ उतारा धारक शेतकरी कुटुंबे
- शासकीय अनाथाश्रमातील मुले, शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थी, शासकीय महिला आश्रमातील महिला, शासकीय वृध्दाश्रमातील जेष्ठ नागरिक, माहिती व जनसंपर्क कार्यालयाकडील निकषानुसार पत्रकार, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे नोंदीत जीवित बांधकाम कामगार व त्यांचे कुटुंब - संबधीत संस्था / प्राधिकरण यांचे कडील ओळखपत्रानुसार पात्र.

### लाभ घेण्यासाठी

- वैध शिधापत्रिका व फोटो ओळखपत्र
(आधारकार्ड / पॅनकार्ड / मतदान कार्ड इत्यादी)

## प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचा लाभ घेण्यासाठी

### लाभार्थी

- सामाजिक, आर्थिक व जातनिहाय (SECC) जनगणनेत नोंदीत ग्रामीण व शहरी भागातील कुटुंबे

### लाभ घेण्यासाठी

- आयुष्मान कार्ड (ई-कार्ड) व फोटो ओळखपत्र

### आयुष्मान कार्ड प्राप्त करण्यासाठी

- आयुष्मान कार्ड बनविण्यासाठी शिधापत्रिका/ मा. प्रधानमंत्री महोदयांचे पत्र व वैध ओळखपत्र (आधार कार्ड ) घेऊन अंगीकृत रुग्णालय किंवा नजीकच्या आपले सेवा केंद्र/UTIITSL केंद्रास भेट देणे.
- आपले सरकार सेवा केंद्र / UTIITSL केंद्राकडून प्रति ई-कार्ड रु.३० इतके शुल्क आकारले जाईल तर योजनेच्या अंगीकृत रुग्णालयांमधून ई - कार्ड नि:शुल्क दिले जाईल.
- रुग्णालयात कोणतीही समस्या असल्यास आरोग्यमित्राला भेट देणे.
- संगणकप्रणालीवर नाव असेल तरच आयुष्मान कार्ड (ई-कार्ड) मिळेल.



## वैद्यकीय उपचार व शस्त्रक्रिया

कॅन्सर, हृदयरोग शस्त्रक्रिया, मूत्रपिंड व मूत्रमार्ग विकार शस्त्रक्रिया मेंदू व मज्जासंस्था विकार, अस्थिव्यंग, जठर व आतडे शस्त्रक्रिया, प्लास्टिक सर्जरी, जळीत, स्त्रीरोग, बालरोग, त्वचारोग, नेत्रशस्त्रक्रिया (मोतीबिंदू वगळून), कृत्रिम अवयव, फुफ्फुस आजारावरील उपचार, एंडोक्राइन, इंटरव्हेशनल रेडीओलॉजी व ह्योमॅटॉलॉजी इत्यादी. सांधे प्रत्यारोपण ( गुडघा, खुबा), लहान मुलांचा कर्करोग उपचार, मानसिक आजारांचा समावेश. महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेमध्ये ९९६ उपचारांसाठी प्रति कुटुंब प्रति वर्ष रु १.५ लक्ष पर्यंतचे विमा संरक्षण (मूत्रपिंड प्रत्यारोपणासाठी - रु २.५ लक्ष) तर आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत अतिरिक्त २१३ उपचारांसह एकूण १२०९ उपचारांकरिता प्रति कुटुंब प्रति वर्ष रु ५ लक्ष चे वैद्यकीय संरक्षण.

## अंगीकृत रुग्णालयांची माहिती घेण्याकरिता संपर्क साधा

- अधिक माहितीसाठी - www.jeevandayee.gov.in व www.pmjay.gov.in
- नजीकच्या शासकीय रुग्णालय/जिल्हा रुग्णालयाशी संपर्क साधा.
- आपण प्रधानमंत्री जन आरोग्य योजने अंतर्गत लाभार्थी आहात कि नाही हे जाणून घेण्यासाठी www.mera.pmjay.gov.in या संकेत स्थळावर भेट द्या.



@MJPJAY @JeevandayeeB

**नि:शुल्क दूरध्वनी क्रमांकावर संपर्क करा.**

**महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना: १५५३८८/१८००२३३२२००**

**आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना: १४५५५/१८००१११५६५**

कृपया मागे पहा.

# एकत्रित महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजना



१

चिंता नको
महागड्या आजारांवर या योजनेअंतर्गत
मोफत उपचार मिळतात.



२

उपचारासाठी योजनेच्या अंगीकृत
रुग्णालयामध्ये आरोग्यमित्राला
भेट



३

आरोग्य मित्राकडून योजनेविषयी
संपूर्ण मार्गदर्शन



४

डॉक्टरांचे मार्गदर्शन
व आवश्यक चाचण्या



५

पात्र रुग्णावर
डॉक्टरांचे उपचार



६

रुग्णालयातून सुट्टी व
परतीच्या प्रवासाची रक्कम

## तातडीच्या उपचारासाठी

प्रासंगिक तातडीच्या उपचारांसाठी
त्वरित मान्यता मिळण्याची सुविधा




## राज्य आरोग्य हमी सोसायटी कॉल सेंटर

रुग्णसेवेसाठी २४ तास कार्यरत

**संपर्क साधा**

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना: १५५३८८/१८००२३३२२००
आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना: १४५५५/१८००१११५६५



www.jeevandayee.gov.in | www.pmjay.gov.in